सदरचे पुराव्याचे शपथपत्र हे इंग्रजी भाषेमध्ये दिलेले आहे. दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांच्या व साक्षीदारांच्या संमत्तीने साक्षीदाराचा उलटतपास मराठी भाषेत नोंदविण्यात येत आहे.



**<u>प्रथम पक्षाकरीता साक्षीदार क्र. १ चा शपथेवर अधिकचा</u>**

**<u>सरतपास विधीज्ञ श्री. डी. पी. तोडकर यांचेमार्फत</u>**

२६. मी दाखल केलेल्या शपथपत्रातील सर्व माहिती व मजकुर मी सांगितल्याप्रमाणे असून तो खरा व बरोबर आहे. सदरचा मजकुर मी वाचून त्यावर सही केली आहे.

**<u>द्वितीय पक्षाकरीता प्रथम पक्षकाराच्या साक्षीदाराचा शपथेवर</u>**

**<u>उलटतपास विधीज्ञ श्री. सुनिल पाटील यांचेमार्फत</u>**

२७. सन २००३ मध्ये मी बँकेत डेप्युटी चिफ एक्झीक्युटीव ऑफिसर होतो. त्यावेळी मी ऑडिट , इन्स्पेक्शन व अकौन्ट विभागाचे काम पाहात होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे व द्वितीय पक्ष कामगाराचे काम देण्याबाबत संपर्क नव्हता. घटनेच्या वेळी बँकेच्या रहिमतपुर शाखेत एकुण ६ ते ७ कर्मचारी कार्यरत होते. मी बँकेच्या रहिमतपुर शाखेत कार्यरत नव्हतो. साक्षीदार सांगतो की, ते रहिमतपुर शाखेत बँकेच्या इन्स्पेक्शन कामी जात होते.

२८. हे म्हणणे खरे आहे की, सन २००३ च्या घटनेबाबत मला प्रत्यक्ष कोणतीही माहिती नाही. साक्षीदार सांगतात की, द्वितीय पक्ष कामगाराने राजीनामा दिल्याबाबतची त्यांना माहिती आहे. द्वितीय पक्ष कामगाराने राजीनामा दिल्याबाबतची माहिती मला संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये मिळाली होती. त्या मिटींगमध्ये मी वैयक्तीक हजर होतो.

२९. मार्च २००३ मध्ये द्वितीय पक्ष कामगाराला कळविण्यात आले होते की, त्यांचा दि. २७/०२/२००३ रोजीचा राजीनामा संचालक मंडळासमोर मंजूरीकरीता ठेवण्यात आलेला आहे. संचालक मंडळाची बैठक मार्च २००३ मध्ये झाली होती. हे

......२०/–

म्हणणे खरे नाही की, दि. २८/०२/२००३ रोजी संचालक मंडळाची बैठक झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्या बैठकीत राजीनाम्याचा विषय चर्चेला आला नव्हता. दि. २८/०२/२००३ रोजीच्या बैठकीत राजीनाम्याबाबत चर्चा झाली होती. त्या बैठकीत राजीनाम्याबाबत चर्चा होणार आहे हे द्वितीय पक्ष कामगाराला कळविण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०२/२००३ व दि. १०/०३/२००३ रोजीच्या बैठकीबाबतचे कागदपत्र या प्रकरणात दाखल करण्यात आलेले नाहीत. दि. २८/०२/२००३ व दि. १०/०३/२००३ रोजी बैठकीचे अनेक विषय होते ते सर्व विषय मी आज रोजी सांगू शकत नाही.

३०. हे म्हणणे खरे आहे की, द्वितीय पक्ष कामगाराच्या कायदेशीर देण्याबाबतची गणना मी स्वत: केलेली नाही. सन २००३ मध्ये द्वितीय पक्ष कामगार बँकेत प्यून म्हणून कार्यरत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यांची नेमणूक स्वीपर म्हणून करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद (२) मध्ये त्याबाबतचा मजकुर चूकीचा आहे.

३१. मला सांगता येणार नाही की, द्वितीय पक्ष कामगाराविरूध्द कारणे दाखवा नोटीस अगर दोषारोपपत्र देण्यात आले होते किंवा कसे. द्वितीय पक्ष कामगाराचा राजीनामा मार्च २००३ मध्ये मंजूर करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद (३) मधील त्याबाबतचा मजकुर चूकीचा आहे. मी निश्चित सांगू शकत नाही की, द्वितीय पक्ष कामगाराला कोणत्या तारखेला कार्यमुक्त करण्यात आले. द्वितीय पक्ष कामगाराने ज्या दिवशी राजीनामा दिला त्या दिवशी त्यांचा शेवटचा कामावरचा दिवस होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी राजीनामा देण्यात आला त्याच दिवशी तो मंजूर झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, राजीनामा तारखेपर्यंत द्वितीय पक्ष कामगार बँकेचे कर्मचारी होते.

३२. हे म्हणणे खरे नाही की, द्वितीय पक्षाला रक्कम रू. २,११,८६५/– व रू.८६,१५०/– दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, वरील रक्कम त्यांना रोख न देता त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. ती रक्कम कोणत्या तारखेला त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली हे मी सांगू शकत नाही.

३३. हे म्हणणे खरे नाही की, द्वितीय पक्ष कामगाराच्या दि. ०९/०८/२००४ रोजीच्या पत्राला बँकेने उत्तर दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, द्वितीय पक्ष कामगार हे

सन २००७ मध्ये सहाय्यक कामगार आयुक्त व आयुक्त, सहकार खाते, पुणे यांच्याकडे गेले होते.

३४. हे म्हणणे खरे आहे की, द्वितीय पक्ष कामगाराला पुन्हा कामावर घेण्याकरीता ते प्रयत्न करीत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्रयस्थ बँक कर्मचारी संघटनेने द्वितीय पक्ष कामगाराबाबत आमच्या बँकेला सन २०१२ मध्ये पत्रव्यवहार केला होता.

३५. हे म्हणणे खरे नाही की, द्वितीय पक्ष कामगाराची रहिमतपुर शाखेत फसवणूक करण्यात आलेली आहे. सहाय्यक कामगार आयुक्त, सातारा यांच्याकडील चर्चेमध्ये मी प्रत्यक्ष सहभागी होतो. मला आठवत नाही की, सन २००३ मध्ये रहिमतपुर बँक शाखेत कोण क्लर्क कार्यरत होते. हे म्हणणे खरे नाही की, राजीनाम्यावरील हस्ताक्षर रहिमतपुर शाखेतील क्लर्कचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या क्लर्कने राजीनाम्यावर द्वितीय पक्ष कामगाराची सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, द्वितीय पक्षाची फसवणूक करून राजीनामा घेतला या आशयाची तक्रार त्यांनी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी रहिमतपुर शाखेतील कर्मचारी द्वितीय पक्ष कामगाराला त्रास देवून त्यांच्यावर दबाव टाकत होते. हे म्हणणे खरे नाही की, राजीनामा देण्याचे कारण राजीनाम्यात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, कौटुंबीक कारणाकरीता द्वितीय पक्षाने राजीनामा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, रहिमतपुर शाखेतील कर्मचा–यांनी बळजबरीने द्वितीय पक्ष कामगाराला राजीनामा देण्यास भाग पाडले आहे.

३६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील मजकुर शाबीत करण्याकरीता मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

३७. हे म्हणणे खरे आहे की, दि. ३०/१२/२०१९ रोजीच्या पत्राला आम्ही उत्तर दिलेले नाही. साक्षीदार सांगतात की, द्वितीय पक्ष कामगार आमचे कर्मचारी नसल्यामुळे उत्तर देण्याचा प्रश्न येत नाही. मला आठवत नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकुराबाबतचा तपशिल मी सहाय्यक कामगार आयुक्त, सातारा यांच्यासमक्ष मांडला होता किंवा कसे. तेथे बँकेचे कोणत्या कर्मचा–याला नियुक्त करण्यात आले होते हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, द्वितीय पक्ष कामगाराचा राजीनामा बेकायदेशीर पध्द्तीने घेण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, द्वितीय पक्ष कामगाराला बेकायदेशीररित्या कामावरून कमी करण्यात आले आहे.

३८. हे म्हणणे खरे आहे की, बँकेने द्वितीय पक्ष कामगाराला दिलेली रक्कम परत मागणीकरीता अर्ज केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्रातील मजकुर मी सांगितल्याप्रमाणे तयार करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बँकेवरील आर्थिक ताण टाळण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बँकेकरीता साक्ष देण्यासाठी मला बँकेने अधिकार दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास – संपला.**

**फेरतपासणी – नाही.**

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत
वा.दा.व.अ.क.के

ठिकाण – सातारा.
दिनांक –२४/०७/२०२५.

( निखिल अ. गुप्ता )
पिठासीन अधिकारी,
कामगार न्यायालय, सातारा.